दिन विशेष...

१२७४ : चक्रधर स्वामी यांचे निधन.

१८३४ : मूलद्रव्यांच्या आवर्तसारणीचे जनक मेंडेलेव्ह दमिश्री यांचा जन्म.

१९४८ : पुण्यात नगरवाचन मंदिराची स्थापना झाली.

१९८८ : युगोस्लाव्हियाने डेव्हिस टेनिस कप जिंकला.

महाराष्ट्राचे निडर दैनिक

# शौर्य मराठी

RNI-MAHMAR/2023/89125

सेन्सेक्स ८३,५८०.४० + २६६.४७ (०.३२%)

डॉलर ₹ ९०.५१

आजचे तापमान (डिग्री सेल्सिअस)

| | कमाल | किमान |
|---|---|---|
| जळगाव | ३२ | १४ |
| दिल्ली | २५ | १२ |
| मुंबई | ३५ | २० |
| नागपूर | ३१ | १५ |
| पुणे | ३२ | १० |

epaper.shauryamarathi.com | जळगाव, धुळे, नंदुरबार | शनिवार, दि. ७ फेब्रुवारी २०२६ | वर्ष २ रे | अंक ८९ किंमत : ५ रु. | पाने ४


**सुविचार**

आनंद हा आपल्या मनाच्या अंतरातून येतो; तो बाहेरून शोधू नका.

सूर्योदय - सूर्यास्त

स.-७:०२ संध्या-६:२२

**सोने – चांदी**

सोने(१० ग्रॅम) - चांदी (प्रति किलो)

१,५५,८४५/- २,७५,०००/-

**केळी भाव**

नवती : १३५५ ते १३६०

पिल बाग : ११०१ ते ११०२

कांदे बाग : ----

# नागपूर, छत्रपती संभाजीनगर, नाशिकमध्ये महिंद्रा अ‍ॅन्ड महिंद्राचे वाहन निर्मिती प्रकल्प उभारले जाणार



वृत्तसंस्था । नागपूर

**महिंद्रा अ‍ॅन्ड महिंद्रा कंपनी ईव्ही निर्मितीसह ऑटोमोबाईल क्षेत्रातील एकात्मिक (इंटिग्रेटेड) प्रकल्पासाठी १५ हजार कोटी रुपयांची गुंतवणूक करणार आहे. याबाबतचा सामंजस्य करार आज झाला. या प्रकल्पातून २०२८ पर्यंत वाहन उत्पादन सुरू करण्याचे नियोजन आहे. नागपूरसह छत्रपती संभाजीनगर आणि नाशिक येथेही हे प्रकल्प उभारले जाणार आहे, अशी घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली.**

नागपुरात आयोजित अ‍ॅडव्हान्टेज विदर्भ खासदार औद्योगिक महोत्सवाच्या उद्घाटनप्रसंगी मुख्यमंत्री बोलत होते.

याप्रसंगी मंचावर केंद्रीय भूपृष्ठ वाहतूकमंत्री नितीन गडकरी, पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, पंकज भोयर, अ‍ॅड. आशिष जयस्वाल, पद्मश्री सत्यनारायण नुवाल, अदानी एअरपोर्ट्सचे संचालक जीत अदानी, महिंद्रा अ‍ॅन्ड महिंद्राचे कार्यकारी संचालक राजेश जेजुरीकर, उद्योग विभागाचे प्रधान सचिव डॉ. पी. अनबलगन तसेच उद्योग व राजकीय क्षेत्रातील नामवंत व्यक्ती उपस्थित होते.

अ‍ॅडव्हान्टेज विदर्भ अंतर्गत अत्यंत महत्त्वाचे करार झाले असून, ऑटोमोबाईल क्षेत्रातील महिंद्रा अ‍ॅन्ड महिंद्राने 'नेक्स्ट जनरेशन' वाहनांच्या निर्मितीसाठी करार केला आहे.

नागपूरमध्ये प्रस्तावित प्रकल्प हा एकात्मिक स्वरूपाचा असून, त्यामध्ये ईव्ही एसयूव्ही कार तसेच ट्रॅक्टरची निर्मिती (पान २ वर)

## मुख्यमंत्री फडणवीस यांची घोषणा

### ➢ गडचिरोलीला 'ग्रीन स्टील हब ऑफ इंडिया' करण्याचा निर्धार

नागपूर, गडचिरोली, भंडारा आणि चंद्रपूर हा भाग देशाचा पोलाद हब होत आहे. भविष्यात गडचिरोलीपर्यंत नैसर्गिक वायू नेला जाईल. त्यातून तेथे ग्रीन पोलाद तयार केला जाईल. गडचिरोलीला 'ग्रीन स्टील हब ऑफ इंडिया' बनविण्यात येईल. गडचिरोलीत चीनपेक्षा स्वस्त पोलाद उपलब्ध होणार असून तो जगभरात पाठवला जाईल. आम्ही केवळ नागपूरकडेच लक्ष देतो, असा आरोप होतो. परंतु नव्याने उद्योग मॅग्नेट विकसित करण्यात आले असून, त्यात कोकणातील रायगड, मराठवाड्यातील छत्रपती संभाजीनगर, नाशिक, नागपूर आणि अमरावतीचा समावेश आहे. नागपूरमध्ये उद्योगासाठीची जमीन जवळपास संपली असून, आता विस्तार केला जाईल. सौरऊर्जा मॉडेलमध्ये देशातील सर्वांत मोठी इको–सिस्टीम नागपुरात उभी राहत असून, त्यातून सुमारे एक लाख रोजगारनिर्मिती होईल. तसेच आशियातील सर्वांत आधुनिक एव्हिएशन स्कूल अमरावतीत उभारले जात असून, येथे देश–विदेशासाठी वैमानिक घडवले जातील, असेही फडणवीस म्हणाले.

# परदेशी पर्यटकांची महाराष्ट्राला पहिली पसंती



वृत्तसंस्था । नवी दिल्ली

**जगभरातून भारतात येणाऱ्या विदेशी पर्यटकांसाठी आपला महाराष्ट्र हे देशातील सर्वाधिक पसंतीचे राज्य ठरत आहे. गेल्या तीन वर्षांत राज्यात येणाऱ्या परदेशी पर्यटकांच्या संख्येत दुपटीहून अधिक वाढ झाली आहे.**

२०२२ मध्ये महाराष्ट्रात १५ लक्ष परदेशी पर्यटकांनी भेट दिली होती, हा आकडा २०२४ मध्ये वाढून ३७ लाखांवर पोहोचला असल्याची माहिती केंद्रीय पर्यटन आणि संस्कृती मंत्री गजेंद्र सिंह शेखावत यांनी गुरुवारी राज्यसभेत एका लेखी प्रश्नाला उत्तर देताना दिली. महाराष्ट्राची राजधानी मुंबई हे जागतिक आर्थिक केंद्र मानलं जातं, तर देशाची आर्थिक राजधानी म्हणूनही मुंबईचा जगभरात लौकिक आहे. मुंबई पाहण्यासाठी, येथील पर्यटनासाठी जगभरातून विदेशी पर्यटक येतात. मुंबईचं मार्केट असो किंवा, मुंबईचं समुद्री प्रवेशद्वार असलेलं गेट वे ऑफ इंडिया असो येथे पर्यटकांची मोठी गर्दी असते. यासह, निसर्गरम्य कोकण, जगप्रसिद्ध अजंठा, वेरुळच्या लेण्या आणि ऐतिहासिक वारसा असलेले छत्रपती शिवाजी महाराजांचे गड किल्ले पर्यटकांची पसंती असते. म्हणूनच, येथे पर्यटकांची मोठी गर्दी दिसून येते.

## थोडक्यात

### आरोग्य क्षेत्रात होणार एआय तंत्रज्ञानाचा उपयोग

**नवी दिल्ली ।** एआयचा उपयोग आरोग्य क्षेत्रात देखील होणार आहे. यासाठी राज्यसभेत विधेयक मांडण्यात आले आहे. केंद्र सरकारच्या लोककल्याणकारी धोरणदृष्टीच्या अनुरुप, जनतेचे आरोग्यसुरक्षा, ग्राहक संरक्षण तसेच वैद्यकीय क्षेत्रात कृत्रिम बुद्धिमत्ता वापरत सार्वजनिक आरोग्य सेवेला अधिक बळ देण्यासाठी खासदार डॉ.अजित गोपछडे यांच्या माध्यमातून तीन विधेयके सादर करण्यात आली आहेत.

### वैभव सूर्यवंशीचे वर्ल्ड रेकॉर्ड

**मुंबई ।** वैभव सूर्यवंशी व आरोन जॉर्जच्या जोडीने फलंदाजीला सुरूवात केली. पण आरोन चौथ्या षटकात झेलबाद झाला. यानंतर वैभव सूर्यवंशीने आयुष म्हात्रेच्या जोडीने संघाचा डाव सावरला. आयुष म्हात्रेने ५० चेंडूत अर्धशतक पूर्ण केलं व तो झेलबाद झाला. वैभव सूर्यवंशी व आयुष म्हात्रे यांनी ९० चेंडूत १४२ धावांची उत्कृष्ट भागीदारी रचली. तत्पूर्वी वैभव सूर्यवंशीने ३२ चेंडूत त्याचं अर्धशतक पूर्ण केलं होतं.

## टॅक्सी सेवेत प्रवाशांना मिळणार विविध पर्याय

# 'भारत टॅक्सी'ला टक्कर देण्यासाठी राज्यात सुरु होणार 'छावा अ‍ॅप

वृत्तसंस्था । मुंबई




**केंद्रीय गृह मंत्री अमित शहा यांच्या हस्ते मोठ्या थाटामाटात सहकारी तत्वावर भारत टॅक्सीचे उद्घाटन झाले. मात्र त्यामुळे ओला आणि उबर सारख्या जागतिक कंपन्यांसमोर आव्हान उभे राहिले आहे. आता भारत अ‍ॅपला टक्कर देण्यात राज्यात लवकरच छावा अ‍ॅप सुरू होणार आहे. परिणामी, अ‍ॅप आधारित टॅक्सी सेवेत प्रवाशांना विविध पर्याय उपलब्ध होणार आहेत.**

ओला आणि उबरसारख्या खासगी अ‍ॅप आधारित उबर सारख्या कंपन्यांमध्ये चालकाला प्रत्येक फेरीसाठी १५ ते ३० टक्के मोबदला कंपनीला द्यावा लागतो.

भारत टॅक्सी चालकाला मोबदल्याऐवजी पूर्ण पैसे मिळतील. त्यामुळे चालकांचा यात फायदा होणार आहे. आता उबर आणि ओलाच्या असणार आहे.

भारत टॅक्सीमध्ये चालक आणि प्रवासीभिमुख सेवा प्रदान केल्या आहेत. तसेच राज्यात छावा अ‍ॅप आधारित कॅब सेवा सुरू करण्यात येणार आहे. छावा अ‍ॅप राज्य शासनाच्या परिवहन विभागाच्या सहकार्याने एसटी महामंडळामार्फत (पान २ वर)

# नाचणखेडा येथे हळदीचा कार्यक्रम आटोपून येणाऱ्या कारचा अपघात

## ● पिंप्राळा येथील दोघांचा जागीच मृत्यू, पाच जण गंभीर जखमी

प्रतिनिधी । जळगाव



नाचणखेडा (ता.पाचोरा) येथे काल गुरुवारी हळदीचा कार्यक्रम आटोपून शुक्रवारी पहाटे २ वाजता जळगावकडे परत येणाऱ्या इनोव्हा कारचा बिल्दी फाट्यावर भीषण अपघात झाला. या अपघातात दोन तरुणांचा जागीच मृत्यू झाला, तर अन्य पाच जण गंभीर जखमी झाले आहेत. मृत व जखमी सर्व पिंप्राळा येथील रहिवासी आहेत.

श्रीरंग सुरेश पाटील (२७) आणि प्रसन्न रवींद्र निमजे (२१, दोन्ही रा. पिंप्राळा, जळगाव), अशी अपघातातील मृतांची नावे आहेत. रोहित सोनार (२३), निखिल कच्छवा (२५), अनिकेत कोळी (२२), निलेश वाघ (२३, सर्व रा.पिंप्राळा), अशी गंभीर जखमी तरुणांची नावे आहेत. श्रीरंग पाटील, प्रसन्न निमजे आणि इतर पाच तरुण इनोव्हा कारने नाचणखेडा येथे गुरूवारी सायंकाळी हळदीच्या कार्यक्रमासाठी गेले होते. हळदीचा कार्यक्रम आटोपल्यावर घराकडे परत येत असताना शुक्रवारी पहाटे २ वाजेच्या सुमारास पाचोरा–जळगाव रस्त्यावरील बिल्दी फाट्याजवळ अचानक चालकाचा वाहनावरील ताबा सुटला. त्यामुळे भरधाव कार थेट रस्त्याच्या कडेला दोन ते तीन वेळा पलटी झाली.

या अपघातात श्रीरंग सुरेश पाटील आणि प्रसन्न रवींद्र निमजे या दोघांचा जागीच मृत्यू झाला. इतर पाच जण गंभीर जखमी झाले आहेत. अपघातात मृत्यू झालेल्या श्रीरंग पाटील याचे दोन महिन्यांपूर्वीच लग्न पार पडले होते. जखमींपैकी काही तरुणांवर पाचोरा येथे उपचार सुरू आहेत. तर गंभीर जखमी रोहित सोनार (पान २ वर)

# शेतजमीन एनए परवानगीसाठी आता जिल्हाधिकाऱ्यांकडे जाण्याची गरज नाही



प्रतिनिधी । जळगाव

राज्य सरकारने विकास आराखडा (डीपी) अथवा प्रादेशिक विकास आराखडा (आरपी) लागू असलेल्या शेतजमिनींबाबत मोठा निर्णय घेतला आहे. या आराखड्यांमध्ये निवासी झोन दर्शविण्यात आलेल्या शेतजमिनींवर बांधकामासाठी जिल्हाधिकाऱ्यांकडून बिनशेती (एनए) परवानगी (पान २ वर)

● शेतजमिनीचे बिनशेतीमध्ये रूपांतर करण्यासाठी महाराष्ट्र महसूल अधिनियम १९६६ मधील ४१ ते ४७ आणि १०८ ते १२० ही कलमे राज्य सरकारने रद्द केली आहेत. तर ४२ कलमामध्ये दुरुस्ती केली आहे. या नवीन बदलांमुळे जागा मालक, घरबांधणी व्यावसायिक तसेच सर्वसामान्य नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे. जिल्हाधिकारी कार्यालयातील फेऱ्या टळणार असून, परवानगीची प्रक्रिया अधिक जलद होणार आहे. विशेषतः शहरीकरण वेगाने वाढत असलेल्या भागांमध्ये बांधकाम परवानग्यांबाबतचा विलंब कमी होऊन विकास कामांना गती मिळेल, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे. तसेच, प्रक्रिया एकाच ठिकाणी पूर्ण होत असल्याने पारदर्शकता वाढून गैरप्रकारांवरही आळा बसण्यास मदत होणार असल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले आहे.

# लाडक्या बहिणींना ई–केवायसीमध्ये दुरुस्तीची संधी

वृत्तसंस्था । मुंबई

**मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेचा लाभ घेणाऱ्या महिलांसाठी एक आनंदाची बातमी आहे.**



या योजनेसाठी पात्र असलेल्या ज्या लाभार्थी महिलांनी केवायसी केली आहे, मात्र त्यामध्ये काही चुका झाल्यामुळे त्यांचे पैसे बंद झाले आहेत, अशा महिलांना आता पुन्हा एकदा आपल्या ई केवायसीमध्ये दुरुस्ती करण्याची संधी मिळणार आहे. ३१ मार्च २०२६ पर्यंत लाभार्थी महिला ऑनलाईन पोर्टच्या माध्यमातून केवायसीमध्ये दुरुस्ती करू शकणार आहेत, याबाबत आदिती तटकरे यांनी माहिती दिली आहे.

# पाकिस्तानात नमाजानंतर भीषण स्फोट

## ● ३१ जणांचा मृत्यू, १६९ जखमी



वृत्तसंस्था । कराची

पाकिस्तानची राजधानी इस्लामाबाद शुक्रवारी दुपारी भीषण बॉम्बस्फोटाने हादरली. तरलाई भागातील एका इमामवाड्यामध्ये जुमेच्या नमाजदरम्यान झालेल्या या स्फोटात ३१ जणांचा मृत्यू आणि १६९ हून अधिक लोक जखमी झाले आहेत. मृतांचा आकडा वाढण्याची भीती व्यक्त करण्यात येत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, शुक्रवारी नमाजसाठी भाविकांची मोठी गर्दी झालेली असताना हा स्फोट झाला. स्फोटाची तीव्रता इतकी मोठी होती की परिसरातील इमारतींना हादरे बसले. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी संपूर्ण परिसराला वेढा घातला असून रेस्क्यू ११२२ च्या पथकांकडून तातडीने मदतकार्य सुरू करण्यात

**● हा हल्ला म्हणजे भेकड कृत्य आहे. अशा दहशतवादी हल्ल्यांमुळे देशाचे मनोधैर्य खचणार नाही. शांतता आणि स्थिरतेसाठी आपण सर्वांनी एकत्र येण्याची गरज आहे.**


सेंटर आणि न्यूरोलॉजी विभाग सक्रिय करण्यात आले आहेत. पॉलीक्लिनिक आणि रुग्णालय या रुग्णालयांमध्येही जखमींना दाखल करण्यात आले असून डॉक्टरांच्या सुट्या रद्द करण्यात आल्या आहेत. इस्लामाबाद पोलीस प्रवक्ते तकी जवाद यांनी दिलेल्या माहितीनुसार, हा आत्मघाती हल्ला होता की आयईडी स्फोट, याचा तपास फॉरेन्सिक टीम करत आहे. अद्याप कोणत्याही संघटनेने या हल्ल्याची जबाबदारी स्वीकारलेली नाही.

# राजस्थानच्या शेतकऱ्यांसमोर नशाबाज पोपटांचे संकट

## अफूच्या बोंडांची चटक लागल्याने दररोज करताहेत लाखो रुपयांचे पीक फस्त

वृत्तसंस्था । चितोडगड

**नशाखोर व्यक्तीमुळे, नशेबाजांमुळे गडबड, गोंधळ, ताण– तणाव निर्माण झाल्याचे आपण सर्रास ऐकतो. पण. राजस्थानच्या शेतकऱ्यांसमोर मोठं संकट ओढावले आहे, ते अफूची बोंडे खाणाऱ्या पोपटांमुळे. अफूची लागवड केलेला शेतकरी कायम सतर्क असतोच. पण, पोपटांमुळे शेतकऱ्यांच्या चिंतेत भर पडली आहे. रात्र–दिवस शेतकऱ्यांना कडक पहारा द्यावा लागत आहे.**





देशाच्या बहुतेक भागात अफूच्या शेतीवर बंदी आहे. पण, राजस्थानच्या चितोडगड भागात पूर्व परवानगी घेऊन, पोलिसांच्या नियंत्रणाखाली अफूची शेती केली जाते. चितोडगडमधील पोपटांना अफूची बोंडे खाण्याचे व्यसन लागले आहे. पोपटांच्या झुंडीच्या झुडी अफूची बोंडे फस्त करीत आहेत. एका वृत्तवाहिनीने दिलेल्या वृत्तानुसार पोपटांचे थवेच्या थवे रोज सुमारे दोन लाख रुपयांची अफू फस्त करीत आहेत. अफू खाऊनही पोपटांवर काहीच परिणाम दिसून येत नाही. अफूची बोंडे फस्त करूनही सराईतपणे आकाशात उडताना दिसतात.मेवाड परिसरातील अफूची शेतीही नशेबाज पोपटांच्या तडाख्यात (पान २ वर)

### ● राजस्थानमध्येच अफूची शेती का?

**राजस्थानच्या भिलवाडा, कोटा, प्रतापगड. उदयपूरसह १२ जिल्ह्यांत आणि मध्य प्रदेश, उत्तर प्रदेशात अफूचे उत्पादन घेतले जाते. देशातील राजस्थान, मध्य प्रदेश आणि उत्तर प्रदेश ही राज्ये अफू शेतीसाठी परवानगी दिलेली राज्य आहेत. अंमली पदार्थ विभागाच्या सक्त नियंत्रणाखाली, पूर्वपरवानगी देऊनच अफूची शेती केली जाते.**

## संपादकीय

### टी २० चे राजकारण

भारत आणि श्रीलंका संयुक्त यजमान असलेली टी २० क्रिकेट विश्वचषक स्पर्धा ७ फेब्रुवारीपासून सुरू होणार आहे. नेहमीप्रमाणे कोणत्याही स्पर्धेत ज्याप्रमाणे वादविवाद होतात, त्याप्रमाणे या स्पर्धेलाही वादविवादाचे आणि राजकारणाचे गालबोट लागले आहे. त्यालाही नेहमीप्रमाणे पाकिस्तानच जबाबदार आहे. या स्पर्धेमध्ये १५ फेब्रुवारी रोजी भारत आणि पाकिस्तान यांच्यामधील जो सामना होणार होता त्या सामन्यावर बहिष्कार घालून पाकिस्तानने क्रिकेटच्या मैदानावर राजकारण आणले आहे. खरे तर पाकिस्तानसारख्या संघाला या स्पर्धेमध्ये सहभाग घेता यावा म्हणून ही स्पर्धा संयुक्तपणे भरवण्यात आली होती. अन्यथा ही स्पर्धा फक्त भारताच्या मैदानांवरच खेळवली जाणार होती. पण पाकिस्तानची सोय व्हावी म्हणून श्रीलंकेला सह यजमान करण्यात आले आहे. असे असतानासुद्धा बांगलादेशला पाठिंबा देण्याच्या नादात पाकिस्तानने क्रिकेटच्या मैदानावर राजकारण आणून आपल्याच पायावर कुऱ्हाड मारली आहे. सध्या भारत आणि बांगलादेश यांच्यातील संबंध चांगले नाहीत. या पार्श्वभूमीवर आयपीएलमधील लिलावामध्ये एका बांगलादेशी खेळाडूला सहभागी करून घेतल्यानंतर भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने त्याला विरोध दर्शवला होता. या खेळाडूला त्या लिलावातून आणि आयपीएलमधून बाहेर काढण्यात आले होते. त्यानंतर त्याला प्रतिसाद किंवा प्रत्युत्तर म्हणून बांगलादेश संघाने आम्ही भारतात टी२० विश्वचषक स्पर्धा खेळायला जाणार नाही अशी घोषणा केली. सुरक्षेच्या कारणावरून आम्ही भारताचा दौरा करणार नाही, आमचे सामने इतरत्र नियोजित करावेत अशी बांगलादेशची मागणी होती. पण ऐनवेळी ते शक्य नसल्याने आयसीसीने बांगलादेशला या स्पर्धेतूनच बाजूला काढले आणि त्यांच्या जागी दुसऱ्या देशाला संधी दिली. खरेतर हा विषय येथेच संपत असताना पाकिस्तानने विनाकारण त्यामध्ये नाक खुपसले आणि बांगलादेशला पाठिंबा देण्याच्या नादात आम्हीसुद्धा भारताविरुद्धचा १५ फेब्रुवारीचा सामना खेळणार नाही अशी घोषणा केली. पाकिस्तानच्या या घोषणेला कोणताही ठोस पाया नव्हता आणि कोणतेही तत्त्व नव्हते. कारण हा सामना न खेळण्याची घोषणा होत असतानाच अंडर१९ विश्वचषक स्पर्धेमध्ये भारत आणि पाकिस्तान यांच्यामध्ये एक सामना झाला, ज्यामध्ये भारतीय युवकांनी पाकिस्तानवर मात केली. एवढेच नाही तर १५ फेब्रुवारीलाच भारत आणि पाकिस्तान यांच्या महिलांमध्येसुद्धा एक सामना होणार आहे. जर पाकिस्तानला भारतासोबत क्रिकेटविषयक संबंध ठेवायचे नसतील तर ते सर्वच पातळीवर ठेवायला नकोत. पण त्यांनी सोयीस्करपणे फक्त टी२० विश्वचषक स्पर्धेतील सामना न खेळण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयाचा पाकिस्तानलाच अनेक अर्थाने फटका बसणार आहे. एक तर त्यांना दोन गुण गमवावे लागणार आहेतच. आयसीसी आणि प्रायोजकांकडूनसुद्धा मोठ्या प्रमाणावर आर्थिक दंडही लावला जाऊ शकतो. कोणताही देश जेव्हा आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्पर्धेमध्ये भाग घेतो तेव्हा त्यांचा ब्रॉड कास्टर्स, प्रायोजक आणि सहप्रायोजकांसोबतही करार असतो. कोणतेही कारण न देता संघांनी या स्पर्धेमध्ये सहभागी होणे अपेक्षित असते. एखादा संघ न पटणाऱ्या एखाद्या कारणासाठी या स्पर्धेत सहभागी झाला नाही तर तो करार भंग मानला जातो आणि सर्व प्रायोजक अशा संघाविरोधात आर्थिक नुकसानभरपाईची मागणी करू शकतात. भारत आणि पाकिस्तान यांच्यातील सामना नेहमीच सर्वांना मोठ्या प्रमाणात उत्पन्न देणारा सामना असतो. जाहिरातदार ब्रॉडकास्ट कंपन्या सर्वांसाठीच हा सामना म्हणजे कमाईची मोठी संधी असते.

# ...तर मुख्य आरोग्य निरीक्षक, आरोग्य निरीक्षक, मुकादमवर थेट निलंबनाची कारवाई

## आयुक्त नितीन कापडणीस यांचा इशारा; शहरातील विविध भागातील स्वच्छतेच्या कामाची केली पाहणी

प्रतिनिधी । धुळे

**महापालिका आयुक्त नितीन कापडणीस यांनी गुरुवारी (दि.५) शहरातील विविध भागातील स्वच्छतेच्या कामाची पाहणी केली. यावेळी त्यांनी या सर्व भागांतील कचरा उचलण्यात यावा, साईडपट्ट्या स्वच्छ असाव्यात यासह विविध सूचना देत आजपासून अस्वच्छता आढळल्यास मुख्य आरोग्य निरीक्षक, आरोग्य निरीक्षक आणि मुकादम यांच्यावर थेट निलंबनाची कारवाई सुरू होणार असल्याचा इशारा त्यांनी यावेळी दिला.**



आयुक्त नितीन कापडणीस यांनी गुरुवारी (दि.५) शहरातील जय हिंद कॉलेज रोड, ५ व ८ नंबर शाळेसमोरील रस्ता, बारा पत्थर चौक, छत्रपती शिवाजी महाराज पुतळा (दोन्ही रस्ते), तहसीलदार कार्यालय रोड, मनपा (दोन्ही कार्यालये रोड), पांझरा नदीवरील पुल, मनपा नाट्यगृहासमोरील रस्ता, ८० फुटी रोड, दसरा मैदान चौक, मालेगाव रोड, देवपूर रोड, एकविरा मंदिराकडे जाणारा मुख्य रस्ता, नदीकाठचा रस्ता, पांझरा नदी फुडझोन परिसर, गांधी चौक यासह विविध भागांची पाहणी केली. यावेळी त्यांनी स्वच्छता निरीक्षक व मुकादम यांना हे भाग पूर्णतः स्वच्छ हवेत, सर्व कचरा उचललेला असावा, साईडपट्ट्या स्वच्छ असाव्या, डिव्हायडर स्वच्छ असावे. कामापूर्वीचे आणि केल्यानंतरचे फोटो असावे आदी सुचना दिल्या. तसेच आजपासून अस्वच्छता आढळल्यास मुख्य आरोग्य निरीक्षक, आरोग्य निरीक्षक आणि मुकादम यांच्यावर थेट निलंबनाची कारवाई सुरू होणार असल्याचा इशाराही त्यांनी यावेळी दिला.

## राणीपूर येथे दुकानाजवळून मोटारसायकल लंपास

प्रतिनिधी । नंदुरबार

जिल्ह्यात दुचाकी चोरीच्या घटनांमध्ये मोठी वाढ झाली असून राणीपूर येथे कामासाठी आलेल्या साबलापाणी येथील युवकाची दुचाकी लांबविण्यात आल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी म्हसावद पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सुकलाल फाड्या पावरा (रा. साबलापाणी, ता.धडगाव) हा युवक त्याच्या खाजगी कामानिमित्त राणीपूर येथे आला होता. यावेळी त्याने गावातीलच एका मेडीकलजवळ दुचाकी उभी केली होती. दरम्यान, अज्ञात चोरट्याने ही दुचाकी चोरून नेली. याप्रकरणी पावरा यांनी दिलेल्या फिर्यादीवरून म्हसावद पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास हेडकॉन्स्टेबल दिलवरसिंग पावरा करीत आहेत.

## वावद येथील विद्यार्थ्यांचे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात

प्रतिनिधी । नंदुरबार



**तालुक्यातील वावद येथील के.डी. गावित विद्यालयात वार्षिक स्नेहसंमेलनाचे आयोजन करण्यात आले होते.**

अध्यक्षस्थानी लिलाबाई लुळे तर उद्घाटक कार्यालयीन अधीक्षक व्ही.एस. पाटील पाटील होते. प्रमुख पाहुणे प्राचार्य के.डी. मराठे, शरद बागुल, गोरखनाथ बोराणे, योगेश पाटील, राजेंद्र चौधरी, शामराव धनगर, भटू नमाईत, जगन्नाथ वाघ, कपिल मोरे, नितीन देसले, विनोद पाटील, उदय पाटील, सुनिल घुगे उपस्थित होते. शाळेतील विद्यार्थ्यांनी संमेलनात देशभक्तीपर गाणे, अहिराणी, कानबाईची गाणे, आदिवासी गाण्यांवर नृत्य करून उपस्थितांची मने जिंकली.

लिलाबाई लुळे यांनी विद्यार्थ्यांना संबोधित करताना सांगितले की, विद्यार्थ्यांनी कितीही मोठे व्हा, परदेशात शिक्षण घ्या. जीवन जगण्याची खरी कला अवगत करायची असेल तर स्नेहसंमेलनात प्रत्येकाने भाग घ्यायचा. निसर्गाने प्रत्येकाला गायन, वकृत्व व कौशल्याची देणगी दिली आहे. ती पुढे नेण्याचे काम विद्यार्थ्यांनी करावे, असे त्यांनी आवाहन केले. व्ही.एस. पाटील यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, जेव्हा ही चिमुकले रंगमंचावर कला सादर करतात. तेव्हा त्यांचे उज्ज्वल भविष्य डोळ्यासमोर उभे राहते. हीच मुले उद्याचे उत्तम गायक व कलाकार बनतील, अशी आशा त्यांनी व्यक्त केली.

## साने गुरुजी बालवाडी विभागाचे स्नेहसंमेलन उत्साहात

प्रतिनिधी । अमळनेर

येथील शिक्षण प्रसारक मंडळाचे साने गुरुजी बालवाडी विभागाचे स्नेहसंमेलन भव्य अशा छत्रपती शिवाजी महाराज नाट्यगृहात साजरे झाले. बालविकास मंदिराच्या मुख्याध्यापिका वैशाली महाजनसह सर्व शिक्षकांनी गेल्या महिनाभरापासून प्रत्येक वर्गाची ग्रुप डान्स नर्सरीची शिसोदे आणि नाटिका वैभवी अशी सर्वांनी तयारी करून सादरीकरण केले. पालकांनी सुद्धा आपल्या पाल्यांसोबत विविध नृत्य सादर करून महिला पालकांनी मनोरंजनात्मक खेळ खेळून उत्साह दाखविला. सुरुवातीला संस्थेचे अध्यक्ष हेमकांत पाटील, सचिव संदीप घोरपडे, उपाध्यक्ष गुणवंतराव पाटील, सहसचिव ॲड.अशोक बाविस्कर, संचालक प्रा.एस.जे. शेख, किरण पाटील, मगन पाटील आदींच्याहस्ते दीपप्रज्वलन, प्रतिमापूजन करण्यात आले.

## ध्वनी प्रदूषणाबाबत समाजात जागृती व्हावी; पर्यावरण प्रेमी समूहाचे निवेदन

प्रतिनिधी । चोपडा

**येथील पर्यावरण अभ्यासक व पर्यावरण संरक्षणाबाबत जागृत असलेल्या पर्यावरण प्रेमी समूहाच्या माध्यमातून शहरात वाढणाऱ्या ध्वनी प्रदूषणाबाबत शहर पोलीस स्टेशन येथील पोलीस निरीक्षक मधुकर साळवे यांना निवेदन देण्यात आले. इयत्ता बारावी वर्गाची परीक्षा पुढील आठवड्यात सुरू होत असून त्यानंतर लगेच दहावी वर्गाच्या परीक्षा सुरू होणार आहेत.**



लग्नसराईमुळे व इतर विविध कारणांमुळे विद्यार्थ्यांच्या अभ्यासकाळात रात्री १० वाजेनंतर वाजणारे डीजे भुंगे यामुळे विद्यार्थ्यांच्या अभ्यासावर विपरीत परिणाम होतो तसेच परिसरातील वृद्ध, बालक व रुग्णांना या ध्वनी प्रदूषणामुळे त्रास सहन करावा लागतो. ध्वनी प्रदूषण नियंत्रणात आणण्यासाठी पोलीस प्रशासनाने समाजात जाणीव जागृती करून कायद्याचे स्वरूप जनतेस लक्षात आणून द्यावे व ध्वनी प्रदूषण होणार नाही याची दक्षता घ्यावी, याबाबतचे निवेदन शहरातील पर्यावरण प्रेमी समूहामार्फत पोलीस निरीक्षकांना देण्यात आले.

पोलीस निरीक्षक मधुकर साळवे यांनी देखील ध्वनी प्रदूषण नियंत्रणात आणण्याचे आश्वासन दिले.

निवेदनावर प्रा. शैलेश वाघ, प्रा. आर. एम. बागुल, डॉ. मुकेश पाटील, मोतीराम पावरा, जितेंद्र पाटील, प्रदीप सौदागर, संगीता पाटील, ए. एम. बाविस्कर, प्रणाली तायडे, रुपेश पाटील व इतरांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## पान १ वरुन

### 'भारत टॅक्सी'ला टक्कर......

सुरू करण्यात येत आहे. भविष्यात एसटी महामंडळाला उत्पन्नाचा नवा स्त्रोत निर्माण करणे व प्रवाशांना एक विश्वासार्ह सेवा उपलब्ध करून देणे या उद्देशाने शासकीय ॲप एसटी महामंडळ चालवणार आहे. या ॲपद्वारे राज्यातील मराठी तरुणांना रोजगाराची संधी उपलब्ध होणार आहे. छावा ॲप तयार करण्याची प्रक्रिया अंतिम टप्प्यात आहे. यासाठी समिती नेमली असून, समितीचा अहवाल या महिन्यात प्राप्त होणार आहे. त्यानंतर साधारण मार्च किंवा एप्रिल महिन्यात निविदा प्रक्रिया राबवण्यात येईल. सध्या ओला, उबर, रॅपिडो यासारख्या ॲप आधारित टॅक्सी सेवा आहेत. सध्या या कंपन्यांची मक्तेदारी आहे. भविष्यात मुंबईसह राज्यात भारत टॅक्सी सुरू झाली आणि छावा ॲप सुरू झाल्यास प्रवाशांना फायदा होईल. तसेच सध्या कार्यरत कंपन्यांची मक्तेदारी मोडीत काढली जाईल. यातून प्रवाशांचा फायदा होईल. – प्रताप सरनाईक, परिवहन मंत्री

### नाचणखेडा येथे हळदीचा......

यास जळगाव येथे पुढील उपचारासाठी हलविण्यात आले आहे. अपघात इतका भीषण होता की, इनोव्हा कार पूर्ण चक्काचूर झाली आहे. कारच्या धडकेत महावितरणचा पोलही कोसळला आहे. अपघाताची माहिती मिळताच पाचोरा पोलीस ठाण्याचे अधिकारी, कर्मचारी लगेच घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी जखमींना तातडीने जळगाव तसेच पाचोरा येथे उपचारासाठी हलविण्याची व्यवस्था केली. तर मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी पाचोरा ग्रामीण रुग्णालयात रवाना करणण्यात आले होते. या घटनेमुळे पिंप्राळा परिसरात शोककळा पसरली आहे. अपघाताची माहिती मिळताच रुग्णवाहिका चालक बबलू मराठे, भागवत पाटील, गोलू पाटील आणि किशोर लोहार यांनी घटनास्थळी धाव घेत पोलिसांना माहिती दिली. त्यानंतर पाचोरा पोलीस ठाण्याचे कर्मचारी गजानन जोशी, दिलीप पाटील, दिलीप वाघमोडे, अशोक पाटील, वाशिम शेख व गजानन देशमुख यांनी घटनास्थळी दाखल होत परिस्थिती नियंत्रणात आणली. दरम्यान, अपघातानंतर इनोव्हा कारचा दरवाजा अडकून पडल्याने रुग्णवाहिका चालकांनी कारचा पत्रा कापून आतील मृतदेह बाहेर काढले. अपघातानंतर कारचे रेडिएटर गरम झाल्याने आग लागण्याची शक्यता निर्माण झाली होती. ही बाब लक्षात येताच रुग्णवाहिका चालक किशोर लोहार यांनी तत्काळ प्रसंगावधान दाखवत गाडीवर पाणी टाकून संभाव्य आग रोखली. याप्रकरणी पाचोरा पोलीस ठाण्यात अपघाताची नोंद करण्यात आली आहे.

### शेतजमीन एनए परवानगीसाठी......

घेण्याची आवश्यकता आता राहणार नाही. स्थानिक नियोजन प्राधिकरण म्हणजेच महापालिकांना त्याचे अधिकार देण्यात आले आहेत.या निर्णयाबाबतचे अधिकृत राजपत्र राज्य सरकारच्या विधी व न्याय विभागाच्या सहसचिव सुप्रिया धावरे यांनी प्रसिद्ध केले आहे. नवीन तरतुदीनुसार, निवासी झोनमध्ये समाविष्ट असलेल्या शेतजमिनींसाठी बिनशेती परवानगी देताना एकरकमी बिनशेती कर वसूल करण्याचे अधिकारही आता स्थानिक स्वराज्य संस्थांना देण्यात आले आहेत. त्यामुळे नागरिकांना जिल्हाधिकारी कार्यालयाच्या फेऱ्या टाळता येणार आहेत. महापालिकेमार्फतच संपूर्ण प्रक्रिया पूर्ण होणार आहे. विशेष म्हणजे, विकास किंवा प्रादेशिक आराखड्यात वर्ग १ किंवा वर्ग २ धारणा प्रकरणातील शेतजमिनींवर निवासी झोन दाखविण्यात आला असेल, तरीही बिनशेती परवानगीसाठी जिल्हाधिकाऱ्यांकडे जाण्याची आवश्यकता राहणार नाही. मात्र, वर्ग दोनमधील शेतजमिनीचे रूपांतर वर्ग एकमध्ये करायचे असल्यास, त्यासाठी पूर्वीप्रमाणे जिल्हाधिकाऱ्यांची मान्यता घेणे बंधनकारक राहणार आहे.आतापर्यंत शेतजमीन बिनशेती करण्यासाठी जागा मालकाला प्रथम स्थानिक स्वराज्य संस्थेकडे बांधकाम परवानगीसाठी प्रस्ताव सादर करावा लागत असे. त्यानंतर तो प्रस्ताव स्थानिक स्वराज्य संस्थेकडून जिल्हाधिकाऱ्यांकडे अंतिम मान्यतेसाठी पाठवण्यात येत असे. या दुहेरी प्रक्रियेमुळे वेळखाऊ कारभार होत होता आणि प्रकरणे अनेक महिने प्रलंबित राहत होती. त्यामुळे या पद्धतीत बदल करत राज्य सरकारने जिल्हाधिकाऱ्यांचे बिनशेती परवानगी देण्याचे अधिकार कमी करून ते थेट स्थानिक स्वराज्य संस्थांना दिले आहेत.

### राजस्थानच्या शेतकऱ्यांसमोर......

सापडली आहे. मेवाडमधील अफूचे उभे पीक पोपटांनी नष्ट केले आहे. दररोज शेकडो पोपट थव्याने अफूची बोंडे फस्त करीत आहेत. शेतकऱ्यांचे म्हणणे आहे की, पोपटांना अफूच्या बोंडातील रसाचे इतके व्यसन जडले आहे की, विविध उपाययोजना करूनही अफूच्या शेतीचे पोपटांपासून संरक्षण करण्याचे प्रयत्न अयशस्वी ठरत आहेत. थवेच्या थवे अफूच्या बोंडावर बसून बोंडांमधील रस फस्त करीत आहेत. त्यामुळे अफूची बोंडे खराब होत आहेत. अफू आणि खसखसचा दर्जा घटत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना मोठ्या नुकसानीचा सामना करावा लागत आहे. अफू शेतीचा खर्च वाढला – राजस्थानधील अफूची शेती अतिवृष्टी, गारपिटीपासून वाचली आहे. भरघोस उत्पादन होण्याची शक्यता असतानाच पोपटांमुळे अडचणीत आली आहे. शेतकरी आता अफूच्या शेतीचे संरक्षण करण्यासाठी जाळीचा वापर करीत आहेत. संपूर्ण शेतीच्या भोवती आणि वरून जाळीचे अच्छादन करून पिकाचे संरक्षण करीत आहेत. त्यामुळे खर्चात वाढ झाली आहे. मोठा आवाज करणारी, लाऊड स्पिकर लावून पोपटांना हाकलून लावण्याचे काम शेतकरी करीत आहेत. तरीही पोपटांची दहशत कमी होताना दिसत नाही.

### नागपूर, छत्रपती संभाजीनगर......

केली जाणार आहे. नागपूरसह छत्रपती संभाजीनगर आणि नाशिक येथे कंपनीकडून एकूण १५ हजार कोटी रुपयांची गुंतवणूक होणार असून, त्यातून मोठ्या प्रमाणात रोजगारनिर्मिती होईल, असेही फडणवीस यांनी सांगितले.

## पोलीस मित्र फाउंडेशन कार्यालयाचे उद्घाटन

प्रतिनिधी । शहादा

येथे भगवान विश्वकर्मा जयंतीनिमित्त कर्तव्यदक्ष पोलीस मित्र फाउंडेशच्या कार्यालयाचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी संस्थापक अध्यक्ष सुनील परदेशी, रजनीश सोनार, नगराध्यक्ष अभिजित पाटील, काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष विक्की पाटील, सरपंच वसंत पाटील, सेवानिवृत्त डीवायएसपी बागुल, भाजपचे सचिव डॉ.किशोर पाटील, सरपंच सचिन पावरा, पो.नि. हेमंतकुमार पाटील, पीएसआय जितेंद्र पाटील, सपोनि प्रविण सोनवणे, संदीप वाघ, प्रा.लक्ष्मण जगदाळे यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.

## नवीन मक्तेदारामार्फत कचरा संकलनाला सुरुवात

### सफाई कर्मचाऱ्यांच्याहस्ते घंटागाडीचे पूजन करुन केला शुभारंभ

प्रतिनिधी । धुळे

**महानगरपालिकेमार्फत शहरातील घनकचरा संकलन व वाहतूक कामाचा नवीन मक्ता देण्यात आला असून सोमवार, दि.२ रोजी या नवीन मक्तेदारामार्फत कचरा संकलनाला सुरुवात करण्यात आली.**




धुळे शहरातील कचरा संकलनाचे काम पुणे येथील मे भाग्यदीप वेस्ट मॅनेजमेंट प्रायव्हेट लिमिटेड या संस्थेला देण्यात आले आहे. यासाठी या संस्थेकडून स्वतःच्या मालकीच्या वीस घंटागाड्या विकत घेण्यात आलेल्या आहे. त्यामध्ये पाच घंटागाडी या इलेक्ट्रिकल आहे. त्याचप्रमाणे मनपामार्फत ७९ घंटागाड्या देण्यात येणार आहेत. अशा १०० घंटागाड्यांमार्फत टप्प्याटप्प्याने शहरातील कचरा संकलन करण्यात येणार असल्याची माहिती यावेळी देण्यात आली.रात्रीच्या वेळी सुद्धा कचरा संकलन होणार असून नागरिकांनी आपला कचरा हा इतरत्र न टाकता घंटागाडीतच टाकावा, असे आवाहन देखील आयुक्त नितीन कापडणीस यांनी केले.

सफाई कर्मचाऱ्यांच्याहस्ते श्रीफळ वाढवून व घंटागाडीचे पूजन करून घनकचरा संकलन व वाहतुकीच्या कामाचा शुभारंभ करण्यात आला. याप्रसंगी आयुक्त नितीन कापडणीस, उपायुक्त हेमंत निकम, नगरसचिव मनोज वाघ, लेखा अधिकारी बाळासाहेब तट्टू, मुख्य स्वच्छता निरीक्षक राजेश वसावे, लक्ष्मण पाटील यांच्यासह सर्व स्वच्छता निरीक्षक, मुकादम तसेच संस्थेचे कर्मचारी उपस्थित होते.

## सत्यशोधिका त्यागमूर्ती माता रमाबाई आंबेडकर

**दीन–दुबळ्यांच्या जीवनाला आधार देणाऱ्या महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संघर्षमय प्रवासात सावलीसारखी साथ देणारी, त्याग, सहनशीलता व माणुसकीची मूर्ती म्हणजे माता रमाबाई भीमराव आंबेडकर होत.**



समाजपरिवर्तनाच्या लढ्यात स्वतःचे आयुष्य अर्पण करणाऱ्या रमाईंचे जीवन हे प्रत्येकासाठी प्रेरणादायी आहे. रमाबाई यांचा जन्म ७ फेब्रुवारी १८९८ रोजी दाभोळजवळील वानंद या गावात एका गरीब पण संस्कारशील कुटुंबात झाला. लहान वयातच आई–वडिलांचे छत्र हरपल्याने आयुष्याच्या सुरुवातीलाच दुःखाचा सामना त्यांना करावा लागला. बालविवाहाच्या प्रथेनुसार १९०६ साली भायखळा येथे अत्यंत साध्या पद्धतीने रमाई व भीमराव आंबेडकर यांचा विवाह झाला. बाबासाहेबांच्या शिक्षण, संशोधन व सामाजिक चळवळीच्या काळात रमाईंनी कुटुंबाची संपूर्ण जबाबदारी समर्थपणे पेलली. बाबासाहेब उच्च शिक्षणासाठी परदेशात असताना रमाईंच्या वाट्याला दारिद्र्य, आजारपण व अपार दुःख आले. मात्र स्वाभिमान कधीही ढळू दिला नाही. मदतीसाठी आलेले पैसे त्यांनी नाकारले. स्वाभिमानी पतीची स्वाभिमानी पत्नी ही ओळख त्यांनी कृतीतून जपली. मुलांचे अकाली निधन, आप्तस्वकीयांचे मृत्यू, हालअपेष्टा या सर्व दुःखांवर त्यांनी मौनाने मात केली. घर चालवण्यासाठी रमाईंनी शेण, गोवऱ्या, सरपण गोळा केली. समाजाच्या टोमण्यांची पर्वा न करता त्यांनी कर्तव्य पार पाडले.

बाबासाहेबांच्या अभ्यासात व्यत्यय येऊ नये म्हणून त्या राजगृहाच्या प्रवेशद्वारावर तासनतास थांबत असत. दीन–दुबळ्यांप्रती त्यांचे हृदय करुणेने भरलेले होते. धारवाड येथील वसतिगृहातील उपाशी मुलांसाठी स्वतःचे दागिने देण्याची त्यांची कृती आजही माणुसकीचे श्रेष्ठ उदाहरण ठरते. अतोनात कष्टांमुळे रमाईंचे आरोग्य खालावले आणि २७ मे १९३५ रोजी त्यांचे निधन झाले. रमाईंच्या जाण्याने बाबासाहेबच नव्हे, तर संपूर्ण वंचित समाज पोरका झाला. त्याग, संयम व सेवाभाव यांचे प्रतीक असलेल्या माता रमाबाई आंबेडकर या सत्यशोधक विचारांची अमर प्रेरणा आहेत.

**– पी.डी. पाटील**
**उपशिक्षक, महात्मा फुले हायस्कूल, धरणगाव.**
**जिल्हाध्यक्ष, सत्यशोधक समाज संघ, जळगाव.**

## स्वस्त धान्य दुकान सुरु करण्याची मागणी

प्रतिनिधी । नवापूर

**तालुक्यातील नवी सावरट व चौकीपाडा परिसरातील शिधापत्रिकाधारकांना स्वस्त धान्य दुकानाच्या सुविधेपासून वंचित राहावे लागत असल्याने नव्या दुकानाची उपशाखा सुरू करण्यात यावी, या मागणीसाठी ग्रामस्थांच्यावतीने तहसीलदारांना निवेदन सादर करण्यात आले.**

निवेदनावर सरपंच विलास वसावे, उपसरपंच करिश्मा वळवी, ग्रामपंचायत सदस्य सुभाष गावीत, जितेश गावीत, नारायण गावीत यांच्या सह्या असून मागणीला पुरुष व महिला ग्रामस्थांनी मोठ्या संख्येने पाठिंबा दर्शविला. निवेदन देतेवेळी सुमारे १५० पेक्षा जास्त ग्रामस्थ उपस्थित होते.

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादक – सागर काशिनाथ ओतारी **(मोबा.– ९९७००५३०६६)** व मालक रेखाबाई काशिनाथ ओतारी यांनी श्री समर्थ कृपा डिजिटल प्रिंटर्स, पी –३३, औद्योगिक वसाहत शॉपिंग कॉम्प्लेक्स, जुनी एमआयडीसी, जळगाव –४२५००१ येथे छापून शॉप नं. ई–१२, चौथा मजला, गोलाणी मार्केट, जळगाव– ४२५००१ (महाराष्ट्र), येथे प्रसिद्ध केले.
* **कार्यकारी संपादक – किशोर शंकर शिंपी** (* पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील) (RNI-MAHMAR/2023/89125) कार्यालय दूरध्वनी क्र. : ०२५७–२२२४०६६, E-Mail : shauryamarathi@gmail.com

# जळगावच्या १७ व्या महापौर दीपमाला काळे, उपमहापौर मनोज चौधरी

## बिनविरोध निवडीने महायुतीच्या पदाधिकारी, नगरसेवकांनी फटाके फोडून केला जल्लोष

प्रतिनिधी । जळगाव

**महापालिकेच्या निवडणुकीत निर्विवाद बहुमत मिळवणाऱ्या महायुतीने परस्पर समन्वयातून महापौर आणि उपमहापौर पदांसाठी प्रत्येक एक उमेदवारी अर्ज दाखल केले होते. अपेक्षेनुसार, दोन्ही पदांची बिनविरोध निवड शुक्रवारी पार पडली. जळगावच्या १७ व्या महापौर बनण्याचा बहुमान भाजपच्या दीपमाला काळे यांना मिळाला.**



जळगाव महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीत भाजपने ४६ जागांवर विजय मिळवत सर्वाधिक संख्याबळ प्राप्त करून आपले वर्चस्व सिद्ध केले आहे. याशिवाय, शिवसेना शिंदे गटाला २२ जागा मिळाल्या होत्या, तर राष्ट्रवादी काँग्रेसच्या (अजित पवार गट) एका नगरसेवकासह एका अपक्ष नगरसेवकाने शिवसेना शिंदे गटाला पाठिंबा दिल्याने महायुतीचे एकूण संख्याबळ ७० वर जाऊन पोहोचले होते. त्यामुळे महापौरपद भाजपकडे तर उपमहापौरपद शिवसेना शिंदे गटाकडे जाणार, हे सुरुवातीपासूनच निश्चित मानले जात होते. या राजकीय गणितानुसार महापौरपदासाठी भाजपकडून दीपमाला काळे, तर उपमहापौरपदासाठी शिवसेना शिंदे गटाकडून मनोज चौधरी यांचेच उमेदवारी अर्ज दाखल करण्यात आले होते. या दोन्ही पदांसाठी अन्य कोणताही अर्ज दाखल न झाल्याने दोघांची बिनविरोध निवड निश्चित झाली होती. अखेर शुक्रवारी दोघांच्या बिनविरोध निवडीवर अधिकृत शिक्कामोर्तब करण्यात आले. जिल्हाधिकारी तथा पीठासीन अधिकारी रोहन घुगे यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित विशेष सभेत महापौर व उपमहापौरपदाची बिनविरोध निवड जाहीर करण्यात आली. या प्रक्रियेसाठी महापालिका आयुक्त ज्ञानेश्वर ढेरे यांनी आवश्यक प्रशासकीय सहकार्य केले. निवड जाहीर होताच सभागृहात टाळ्यांच्या गजरात नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचे स्वागत करण्यात आले. जिल्हाधिकारी घुगे यांनी नवनिर्वाचित महापौर आणि उपमहापौर यांचा सत्कार केला. महापौर व उपमहापौरपदाची घोषणा होताच महापालिकेच्या आवारात महायुतीचे पदाधिकारी, नगरसेवक व समर्थकांनी फटाके फोडून आणि जल्लोष करत आनंदोत्सव साजरा केला. यावेळी आमदार सुरेश भोळे यांच्यासह महायुतीतील विविध नेते उपस्थित होते. शहराच्या विकासकामांना गती देण्यासह नागरी सुविधा सुधारण्यावर भर आणि महापालिकेचा कारभार पारदर्शक ठेवण्याचा संकल्प नवनिर्वाचित महापौर दीपमाला काळे व उपमहापौर मनोज चौधरी यांनी व्यक्त केला.

### ➤ दोन्ही मंत्र्यांची महापालिकेवर घट्ट पकड

**भाजप नेते मंत्री गिरीश महाजन आणि शिवसेना शिंदे गटाचे नेते मंत्री गुलाबराव पाटील यांनी महायुतीच्या माध्यमातून महापालिकेची सार्वत्रिक निवडणूक बहुमताने जिंकली. तेवढ्यावरच न थांबता कोणत्याही वादाशिवाय महापौरपदी दीपमाला काळे आणि उपमहापौरपदी मनोज चौधरी यांची बिनविरोध निवड केली. दोन्ही पदांसाठी इच्छुकांची संख्या मोठ्या प्रमाणावर असताना, दोन्ही मंत्र्यांनी जाहीर केलेल्या नावांना फार कोणी उघडपणे विरोध सुद्धा केला नाही. महापालिकेवर दोन्ही मंत्र्यांच्या मर्जीनुसार महापौर, उपमहापौर नियुक्त झाले आहेत. त्यानंतर आता स्थायी समितीसह स्वीकृत नगरसेवकांच्या निवडीकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.**

# पिंप्राळा उड्डाणपुलाजवळील सर्कल त्वरित विकसित करा!

● नगरसेवक ॲड.दिलीप पोकळे यांची मागणी

प्रतिनिधी । जळगाव

**पिंप्राळा रेल्वे उड्डाणपुलाच्या उताराजवळ असलेल्या सुरेश कलेक्शन परिसरातील चौक सध्या अपघातांचा स्पॉट बनला असून या ठिकाणी डी.पी. प्लॅननुसार असलेले सर्कल तातडीने विकसित करावे, अशी मागणी नगरसेवक ॲड.दिलीप पोकळे यांनी महापालिका आयुक्तांकडे केली आहे.**

सर्कलसाठी राखीव जागेवर बेकायदेशीर अतिक्रमण करून सीमा भिंत उभारण्यात आल्याचा गंभीर आरोपही त्यांनी निवेदनातून केला आहे.

उड्डाणपुलाखाली अनधिकृत पार्किंग, फेरीवाल्यांच्या गाड्या आणि नागरिकांची मोठी वर्दळ यामुळे हा संपूर्ण परिसर अत्यंत धोकादायक बनला आहे. येथून शाळकरी मुले, महिला आणि ज्येष्ठ नागरिकांना रस्ता ओलांडताना जीव मुठीत धरुन जावे लागत आहे. या ठिकाणी सातत्याने लहान-मोठे अपघात घडत असून, प्रशासनाने वेळीच दखल न घेतल्यास मोठी जीवितहानी होण्याची शक्यताही ॲड. पोकळे यांनी व्यक्त केली आहे.

### ➤ सर्कलच्या जागेवर अतिक्रमण

सर्वे नंबर ३२९/२अ मधील संबंधित ले-आउट व डी. पी. प्लॅनमध्ये या ठिकाणी सर्कल स्पष्टपणे दर्शवण्यात आले आहे. मात्र संबंधित प्लॉटधारकांनी कोणतीही परवानगी न घेता सर्कलच्या जागेवर अतिक्रमण करत सीमा भिंत बांधली आहे. ही बेकायदेशीर भिंत त्वरित पाडून नियोजित सर्कल विकसित केल्यास वाहतूक कोंडी सुटेल आणि भविष्यातील अपघात टाळता येतील, असा विश्वास ॲड. पोकळे यांनी व्यक्त केला आहे.

### ➤ जिल्हाधिकाऱ्यांना दिले पुरावे...

या समस्येकडे लक्ष वेधण्यासाठी ॲड.पोकळे यांनी केवळ मनपा आयुक्तांसह जिल्हाधिकाऱ्यांनाही पत्राची प्रत पाठवली आहे. सोबत ७/१२ उतारा आणि ले-आउटचा नकाशा जोडून त्यांनी सर्कलची अधिकृत जागा असल्याचे पुराव्यानिशी प्रशासनाच्या निदर्शनास आणून दिले आहे.

## थोडक्यात

### जागतिक कर्करोग दिनानिमित्त जनजागृती

**जळगाव ।** येथील गोदावरी नर्सिंग महाविद्यालयाच्या कम्युनिटी हेल्थ नर्सिंग विभागाच्यावतीने जागतिक कर्करोग दिनानिमित्त चांडक कॅन्सर हॉस्पिटल येथे जनजागृतीपर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी नर्सिंग महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी रुग्णांना लवकर निदानाचे महत्त्व, प्रतिबंधात्मक उपाय तसेच वेळेवर उपचार घेण्याची आवश्यकता याबाबत तर डॉ. निलेश चांडक व डॉ. सागर व्यास यांनी विद्यार्थ्यांना कर्करोगाचे विविध प्रकार, उपचार पद्धती तसेच केमोथेरपी संदर्भात सविस्तर मार्गदर्शन केले.

### भाजप पदवीधर प्रकोष्ठतर्फे उद्या रोजगार मेळावा

**जळगाव ।** यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ नाशिक-मुंबई विभागीय केंद्र, आदर्श शैक्षणिक समूह, भाजपा पदवीधर प्रकोष्ट आणि युवाशक्ती फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने रविवार, दि.८ रोजी नवीन पनवेल येथील आदर्श शैक्षणिक संकुल येथे भव्य रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. मेळाव्यात महाराष्ट्रातील २० हून अधिक नामांकित आंतरराष्ट्रीय कंपन्यांमध्ये २५०० पेक्षा अधिक रिक्त पदांवर भरती होणार आहे. सर्व शाखेतील आजी, माजी पदविका, पदवीधारक विद्यार्थी व विद्यार्थिनींनी रोजगार मेळाव्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन भाजपा पदवीधर प्रकोष्टचे प्रदेशाध्यक्ष धनराज विसपुते, आ.राजूमामा भोळे, जिल्हाध्यक्ष दीपक सूर्यवंशी व पदवीधर प्रकोष्ठचे महानगर जिल्हाध्यक्ष शिरीष तायडे यांनी केले आहे.

### कर्करोग दिनानिमित्त रुग्णांची तपासणी

**जळगाव ।** राष्ट्रीय असंसर्गजन्य रोग नियंत्रण कार्यक्रमांतर्गत कॅन्सर डायगोनिस्टिक व्हॅन आपल्या जिल्ह्यात कर्करोग दिनानिमित्त तपासणी करण्यासाठी जिल्ह्यातील विविध ग्रामीण रुग्णालय व प्राथमिक आरोग्य केंद्रात महिनाभर फिरणार आहे. ग्रामीण रुग्णालय पारोळा येथून निदान शिबिर अभियान सुरु करण्यात आले आहे. या अभियानाचा उद्देश कर्करोगाबद्दल जागरुकता वाढविणे, त्याचे कारणे, लक्षणे आणि उपचार याबाबत माहिती देणे व निदान करणे हा आहे. या अभियानात स्त्रीरोग तज्ञ, दंतशल्यचिकित्सक, कर्करोग विशेषज्ञ यांचा समावेश आहे. ज्यामध्ये नागरिकांना नि:शुल्क कर्करोग तपासणी, ज्यात मुखाचे कॅन्सर, स्तनाचे कॅन्सर, गर्भपिशवीचे कॅसर इत्यादींचे निदान करून त्या संदर्भात योग्य तो सल्ला आपल्याला देण्यात येईल. अधिक माहितीसाठी जवळील ग्रामीण रुग्णालयात संपर्क साधावा.

# मराठीचा अपमान खपवून घेणार नाही!

## मनविसेचा विद्यापीठाला निवेदनाद्वारे इशारा



प्रतिनिधी । जळगाव

**कवियत्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाकडून परिपत्रक आणि अध्यादेश इंग्रजी भाषेत काढण्यात आल्याने शुक्रवारी (दि.६) महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेनाच्यावतीने परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक प्रा.योगेश पाटील यांना निवेदन देण्यात आले. निवेदनात, हा प्रकार म्हणजे मराठी भाषेचा अवमान असून, तो मनसे कदापी सहन करणार नाही, असा इशारा देण्यात आला आहे.**

निवेदनात, महाराष्ट्र हे मराठी भाषेचे राज्य असून उत्तर महाराष्ट्रातील हजारो ग्रामीण, आदिवासी व सामान्य विद्यार्थ्यांशी संबंधित नियम व अध्यादेश इंग्रजीत काढणे म्हणजे मराठी विद्यार्थ्यांवर अन्याय असल्याचेही नमुद करण्यात आले आहे. इंग्रजीत प्रसिद्ध केलेले नियम बहुसंख्य विद्यार्थ्यांना समजत नाहीत. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक हक्कांवर गदा येत आहे. हा प्रकार म्हणजे थेट मराठी भाषेचा अवमान असून तो मनसे कदापी सहन करणार नाही, असा इशाराही यात देण्यात आला.

**आंदोलनाचा इशारा**

परिपत्रक (क्र.२/२०२६) व अध्यादेश (क्र.१३४) यांची अधिकृत मराठी आवृत्ती तात्काळ प्रसिद्ध करावी, यापुढे विद्यापीठातील सर्व परिपत्रके, अध्यादेश व पत्रव्यवहार मराठीतच काढावेत, विद्यार्थ्यांना सहज समजेल, अशी सोप्या व स्पष्ट मराठीचा वापर करावा, अशा मागण्या निवेदनातून करण्यात आल्या आहेत. या मागण्यांवर तात्काळ सकारात्मक निर्णय न झाल्यास, महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेना आंदोलनाचा मार्ग स्वीकारेल, याची विद्यापीठ प्रशासनाने नोंद घ्यावी, असा इशारा दखील देण्यात आला आहे. यावेळी मनविसेचे जिल्हाध्यक्ष कल्पेश पवार, उपशहराध्यक्ष श्रीकृष्ण मेंगडे, ललित शर्मा, प्रकाश जोशी, उदय पाटील व विद्यार्थी उपस्थित होते.

## माता रमाई जयंतीनिमित्त आज कार्यक्रम

प्रतिनिधी । जळगाव



माता रमाई आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त भिमानं बहुउद्देशीय संस्थेच्यावतीने शनिवार, दि.७ रोजी अभिवादनाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

जाणता राजा नगरसह परिसरातील सर्व उपासक व उपासिकांनी सायंकाळी ६:३० वाजता जाणता राजा नगरातील प्रबुद्ध बुद्ध विहार येथे उपस्थित राहावे, असे आवाहन भिमानं बहुउद्देशीय संस्थेचे योगेश अडकमोल यांच्यासह पदाधिकाऱ्यांनी केले आहे.

# पिंप्राळ्यात मारहाणीत गंभीर जखमी तरुणाचा चौथ्या दिवशी उपचारादरम्यान मुंबईत मृत्यू

● पिंप्राळा परिसरात पोलिसांचा घटनास्थळी तगडा बंदोबस्त

प्रतिनिधी । जळगाव

शहरातील पिंप्राळा परिसरातील प्रशांत पाटील चौकात १ फेब्रुवारी रोजी झालेल्या किरकोळ वादातून एका २१ वर्षीय तरुणाला मारहाण करण्यात आली होती. या मारहाणीत गंभीर जखमी तरुण शुभम गजानन सपकाळे याचा मुंबईतील जे.जे. रुग्णालयात उपचारादरम्यान मृत्यू झाला. या घटनेनंतर पिंप्राळा परिसरात शोककळा पसरली असून संताप व्यक्त केला जात आहे.

१ फेब्रुवारी रोजी रात्री १०:३० वाजेच्या सुमारास शुभम सपकाळे हा सार्वजनिक रस्त्यावरून जात असताना, संशयित आरोपींनी त्याला अडवले. काहीही ठोस कारण नसताना विशाल भिका सोनवणे, चंद्रकांत उर्फ बाळा कोळी, यश प्रदीप पाटील (बाँड) आणि धीरज कोळी यांनी संगनमत करून शुभमला लाथाबुक्क्यांनी आणि लाकडी दांडक्याने बेदम मारहाण केली होती. या हल्ल्यात शुभमच्या डोक्याला आणि पाठीला गंभीर दुखापत झाली होती.

रामानंदनगर पोलीस ठाण्यात यापूर्वीच भारतीय न्याय संहितेच्या विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आता शुभमच्या मृत्यूनंतर या गुन्ह्यात 'कलम १०३' (खून) वाढवण्याची प्रक्रिया करण्यात आली. शुभमचा मृत्यू झाल्याची बातमी समजताच पिंप्राळा परिसरात तणाव निर्माण झाला आहे. खबरदारीचा उपाय म्हणून उपविभागीय पोलीस अधिकारी नितीन गणापुरे, पोलीस निरीक्षक राजेंद्र गुंजाळ यांच्या मार्गदर्शनाखाली पिंप्राळा आणि शुभमच्या निवासस्थानी मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. शुभमचा मृतदेह उद्या शुक्रवारी सकाळी १० ते ११ वाजेदरम्यान जळगावात आणला जाण्याची शक्यता आहे. त्यानंतर त्याच्यावर अंत्यसंस्कार केले जातील. या प्रकरणात दोन जणांना अटक केली आहे. तर दोन जण फरार आहेत. पोलीस पथके दोघा आरोपींच्या मागावर आहेत. पोलीस हेड कॉन्स्टेबल योगेश माळी या प्रकरणाचा तपास करत आहेत.

# जिल्ह्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रांना राज्यस्तरीय प्रमाणपत्र

## जानवे प्राथमिक आरोग्य केंद्राचा समावेश

प्रतिनिधी । जळगाव

**राष्ट्रीय गुणवत्ता आश्वासन मानक अंतर्गत राज्यस्तरीय मूल्यमापनात जिल्ह्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रांनी उल्लेखनीय कामगिरी करत गुणवत्ता निकष पूर्ण केले आहेत. त्यात जळगाव जिल्ह्यातील अमळनेर तालुक्यातील जानवे प्राथमिक आरोग्य केंद्राचा समावेश झाला आहे.**

राज्यातील सार्वजनिक आरोग्य सुविधा यांच्या राज्यस्तरीय मूल्यमापनांतर्गत एकूण ७१ आरोग्य संस्थांचे मूल्यमापन करण्यात आले. या मूल्यमापनामध्ये जिल्ह्यातील काही प्राथमिक आरोग्य केंद्रांनी आवश्यक गुणवत्ता निकष पूर्ण करून राज्यस्तरीय प्रमाणनासाठी पात्रता प्राप्त केली आहे.

जिल्ह्यातील अमळनेर तालुक्यातील जानवे प्राथमिक आरोग्य केंद्राने ८७.९८% गुण प्राप्त करून उत्तम कामगिरी केली आहे. तसेच नंदुरबार जिल्ह्यातील नवापूर तालुक्यातील धुलीपाडा (७५.२९%) व तळोदा तालुक्यातील सोंरवल बी.के. (७५.६३%) या प्राथमिक आरोग्य केंद्रांनी देखील गुणवत्ता निकष पूर्ण करत पात्रता मिळवली आहे.

आरोग्य केंद्रांचे बळकटीकरण आणि आश्वासक आरोग्य सेवा पुरविण्यासाठी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल




करनवाल यांनी विशेष लक्ष केंद्रित केल्याने या आरोग्य केंद्राने ओपीडी, प्रयोगशाळा, प्रसूती कक्ष, रुग्णसेवा, संसर्ग नियंत्रण, गुणवत्ता व्यवस्थापन, रुग्ण समाधान अशा विविध विभागांमध्ये अपेक्षित किमान गुण प्राप्त केले आहेत.

# श्री गजानन महाराज प्रगटदिनानिमित्त महाशिवपुराण

प्रतिनिधी । जळगाव

**येथील इंद्रप्रस्थ नगरमधील योगिराज श्री गजानन महाराज बहुउदेशीय संस्था (केशरबाग) यांच्या वतीने शेगाव निवासी समर्थ सद्गुरु श्री गजानन महाराज यांच्या १४८ व्या प्रगटदिन महोत्सवाचा मोठ्या उत्साहात प्रारंभ झाला आहे. ५ ते ८ फेब्रुवारी या कालावधीत चालणाऱ्या या महोत्सवात धार्मिक आणि अध्यात्मिक कार्यक्रमांची रेलचेल पाहायला मिळत आहे.**

पहिल्या दिवशी पारायण आणि महाशिवपुराण कथेला प्रारंभ झाला आहे. या महोत्सवाच्या पहिल्या टप्प्यात सामूहिक ग्रंथ पारायण वाचनाला सुरुवात झाली. यामध्ये रूपा योगेंद्र पवार व दीपाली कुलकर्णी या पारायण वाचक म्हणून सेवा बजावत आहेत. सायंकाळी हभप देवदत्त महाराज मोरदेकर यांच्या रसाळ वाणीतून भव्य श्री शिवमहापुराण कथा सुरू झालेली आहे. कथेच्या पहिल्या दिवशी महाराजांनी शिवपंचाक्षरी मंत्र आणि मौनव्रताचे महत्त्व विशद केले. शिव ही अनादी देवता असून, विश्वाची उत्पत्ती ब्रह्मदेवांनी, संगोपन विष्णूंनी तर संतुलन भगवान शिव करतात. अन्नाचा कण आणि संतांचा क्षण जीवनात अत्यंत महत्त्वाचा आहे,असे सांगत हभप देवदत्त महाराज यांनी अन्नाची नासाडी टाळण्याचे आवाहन केले. जेवताना शेतकऱ्यांचे कष्ट डोळ्यासमोर ठेवावेत, असेही त्यांनी आवर्जून सांगितले. सत्य, दया, दान आणि तप ही खऱ्या धर्माची लक्षणे आहेत.असेही या प्रवचनातून त्यांनी संदेश दिला.

# नशिराबाद नगरपरिषदेची पहिली सभा गुप्ततेच्या सावटाखाली

## नगरसेवकांना ठरावांची माहिती न दिल्याने पारदर्शकतेला तडा

प्रतिनिधी । नशिराबाद

**नगरपरिषदेची नवनिर्वाचित बॉडी अस्तित्वात आल्यानंतर होणारी पहिली सर्वसाधारण सभा ही अत्यंत महत्त्वाची असते. या सभेत प्रामुख्याने आगामी पाच वर्षांच्या कामांची दिशा ठरवली जाते. मात्र, दि. ३ फेब्रुवारी रोजी पार पडलेल्या नशिराबाद नगरपरिषदेच्या सर्वसाधारण सभेत कोणते विषय चर्चिले गेले, कोणते ठराव मंजूर झाले, याबाबत अद्याप कोणतीही अधिकृत माहिती जनतेसमोर न आल्याने व पहिल्याच सभेतील ठराव गुप्त ठेवले जात असल्याने नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त केली जात आहे.**




विशेषतः या संदर्भात माहिती मिळवण्यासाठी पत्रकारांनी नगरपरिषदेतील संबंधित अधिकाऱ्यांशी संपर्क साधला असता, स्पष्ट उत्तर देण्याऐवजी जबाबदारी टाळण्याची भूमिका घेतली गेली. मुख्याधिकारी यांना विचारणा केली असता, ही माहिती नगराध्यक्ष वा उपनगराध्यक्षच देऊ शकतील, असे सांगण्यात आले. मात्र त्यानंतरही सभेतील ठरावांबाबत कोणताही खुलासा करण्यात आलेला नाही. या प्रकारामुळे अनेक प्रश्न उपस्थित होत असून, सभेतील निर्णय जनतेपासून लपवण्यामागे नेमका उद्देश काय? काही वादग्रस्त वा संवेदनशील विषयांवर चर्चा झाली आहे का, की जे उघड करण्यास नगरपरिषदेची तयारी नाही? ही सभा खरोखरच जनहितासाठी होती की काही निवडक लोकांच्या फायद्यासाठी, असा सवाल उपस्थित केला जात आहे. नवनिर्वाचित नगरपरिषदेने कारभारात पारदर्शकता ठेवण्याचे आश्वासन दिले होते. मात्र पहिल्याच सर्वसाधारण सभेनंतर माहिती देण्याबाबत मौन पाळले जात असल्याने, हे आश्वासन प्रत्यक्षात कितपत पाळले जाणार, याबाबत शंका व्यक्त केली जात आहे. या प्रकरणावर नगराध्यक्ष व उपनगराध्यक्ष यांनी तात्काळ खुलासा करावा आणि पहिल्या सर्वसाधारण सभेतील सर्व ठरावांची सविस्तर माहिती जनतेसमोर मांडावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

# शॉर्ट फिल्म मेकिंग कार्यशाळेचा शुभारंभ

प्रतिनिधी । जळगाव

**के.सी.ई. सोसायटीचे कान्ह ललित कला केंद्र, अजिंठा फिल्म सोसायटी आणि छत्रपती संभाजीनगर येथील एम.जी.एम. इन्स्टिट्यूट स्कूल ऑफ फिल्म आर्ट्स यांच्या संयुक्त विद्यमाने दोन दिवसीय शॉर्ट फिल्म मेकिंग कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले असून या कार्यशाळेचे उद्घाटन शुक्रवार, दि.६ रोजी उत्साहात पार पडले.**

यावेळी प्राचार्य संजय भारंबे, सांस्कृतिक समन्वयक शशिकांत वडोदकर, डॉ.जयेंद्र लेकुरवाळे, विनीत जोशी, अनिल भोळे, डॉ.शिव कदम, डॉ. योगिता महाजन, जाई कदम, किरण सोहळे, प्रसाद देसाई, महेश हरबाक आणि करण पगारे आदी उपस्थित होते. कार्यशाळेत कॅमेरा वर्क फ्रेमिंग आणि अँगलचे महत्त्व, लाईटिंग, सिनेमाचा मूड कसा तयार करावा, एडिटिंग, कथा संकलनाचे प्रभावी तंत्र, सिनेमा, रसास्वाद चित्रपटाकडे बघण्याचा नवा दृष्टिकोन याबद्दल माहिती देण्यात आली.

# तरुणांनी नोकरीच्या मागे न लागता उद्योजकतेकडे वळावे

## पाळधी येथे तरुणांसाठी उद्योजक मार्गदर्शन मेळाव्यात प्रतापराव पाटील यांचे प्रतिपादन





**प्रतिनिधी । पाळधी**

तरुणांनी नोकरीच्या मागे न लागता उद्योजकतेकडे वळावे. शासनाच्या विविध योजनांचा लाभ घेऊन स्वतःचा व्यवसाय उभारावा. बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारानुसार मराठी माणूस हा नोकरी मागणारा नाही, तर नोकरी देणारा झाला पाहिजे, असे प्रेरणादायी विचार माजी जिल्हा परिषद सदस्य प्रतापराव पाटील यांनी व्यक्त केले.

पालकमंत्री गुलाबराव पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पाळधी येथील शासकीय विश्रामगृह येथे जीपीएस मित्र परिवाराच्या वतीने भव्य रोजगार व उद्योग मार्गदर्शन मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक संतोष गवळी होते. या मेळाव्यास सेंट्रल बँकेचे मॅनेजर डोहरे, महाराष्ट्र बँकेचे विभागीय व्यवस्थापक प्रवीण सिन्हा, बँक ऑफ बडोदाचे शाखा व्यवस्थापक सुनील देशमुख, स्टेट बँक ऑफ इंडियाचे जिल्हा व्यवस्थापक संतोष दराडे, अण्णासाहेब पाटील महामंडळाचे जिल्हा समन्वयक दीपक बोरसे, महाराष्ट्र संशोधन उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी (अमृत), पुण्याचे राजेंद्र कानडे, जिल्हा उद्योग केंद्राचे आर.आर. डोंगरे, इतर मागासवर्गीय महामंडळाचे जिल्हा व्यवस्थापक योगेश पाटील, जिल्हा कृषी अधीक्षक कुर्बान तडवी, पशुसंवर्धन विभागाचे सहायक आयुक्त श्यामकांत हिरे, माजी सभापती मुकुंदराव नन्नवरे, बँक ऑफ बडोद्याचे राहुल गीते, माजी सभापती राजेंद्र चव्हाण, माजी जिल्हा परिषद सदस्य गोपाल चौधरी, महानगर प्रमुख संतोष पाटील यांच्यासह शिवसेना-युवासेनेचे पदाधिकारी व आजी-माजी लोकप्रतिनिधी, जीपीएस मित्र परिवाराचे सदस्य तसेच युवक व महिला बचत गटाच्या महिला पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. महाराष्ट्र बँकेचे विभागीय व्यवस्थापक प्रवीण सिन्हा यांनी, बँका सकारात्मक भूमिकेतून कर्ज प्रकरणे मंजूर करतात. आर्थिक क्षमतेनुसार व्यवसाय निवडावा,असे मत त्यांनी व्यक्त केले. सूत्रसंचालन भूषण माळी यांनी केले. प्रास्ताविक जिल्हा समन्वयक समीर भाटिया यांनी केले. आभार उद्योजक तथा जीपीएस ग्रुपचे विक्रम पाटील यांनी मानले.

जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक संतोष गवळी यांनी, जीपीएस मित्रपरिवार हे उद्योग-व्यवसायासाठी खरे व्यासपीठ आहे. उद्योजक व्हायचे असेल तर सकारात्मक दृष्टिकोन ठेवा. व्यवसायाचा आत्मा म्हणजे चांगला प्रोजेक्ट, असे त्यांनी सांगितले. जिल्हा कृषी अधीक्षक कुर्बान तडवी, पशुसंवर्धन विभागाचे सहायक आयुक्त श्यामकांत हिरे, बँक प्रतिनिधी गजभिये, महाराष्ट्र संशोधन उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी (अमृत), पुण्याचे राजेंद्र कानडे, माजी सभापती व उद्योजक राजेंद्र चव्हाण व माजी जिल्हा परिषद सदस्य तथा उद्योजक गोपाल चौधरी यांनी मार्गदर्शन केले. मेळाव्यात PMEGP व CMEGP योजनांतर्गत सचिन ज्ञानेश्वर पाटील व उमेश अरुण नंदनवार यांना प्रत्येकी ५० लाख रुपयांच्या कर्ज मंजुरीची पत्रे मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आली.

# विकास विद्यालयाच्या एस.एस.सी.च्या विद्यार्थ्यांना समारंभपूर्वक निरोप





**प्रतिनिधी । चोपडा**

**तालुक्यातील गणपूर येथे विद्यार्थ्यांनी चांगला अभ्यास करून कुटुंबासह शाळेचे नाव उज्वल करावं, असे मत शेंदुर्णी एज्युकेशन संस्थेचे चेअरमन संजयराव गरुड यांनी येथील विकास माध्यमिक विद्यालयाच्या एस.एस.सी.च्या विद्यार्थ्यांच्या निरोप समारंभावेळी अध्यक्ष पदावरून बोलतांना मांडले.**

कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेचे सहसचिव यु.यु.पाटील उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक ए. व्ही. पाटील यांनी केले.

विद्यार्थ्यांमधून दर्शनी परेश पाटील व वेदांती प्रेमराज पाटील यांनी तसेच यू. यू. पाटील, ॲड बाळकृष्ण पाटील, अंबादास राजपूत, प्रवीण पाटील, किरण करंदीकर, शिक्षक व्हि.पी. अहिरे, वर्ग शिक्षक ए.बी. सूर्यवंशी यांनी मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन आर. एन. पाटील यांनी केले. व उपस्थितांचे आभार आर. टी.सावकारे यांनी मानले. कार्यक्रमाला माजी जि. प. सदस्य संभाजी पाटील, पंचायत समितीचे माजी सभापती प्रमोद पाटील, सरपंच भूषण गायकवाड, भवाळेचे सरपंच आनंदराव पाटील, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष अरुण पाटील, संपर्क अधिकारी एम. बी. पाटील, आत्माराम पाटील व विविध संस्थांचे पदाधिकारी उपस्थित होते.

## जळगावात २६ पासून रंगणार खान्देश महोत्सव

**जळगाव ।** महापालिकेतर्फे २६ फेब्रवारी ते २ मार्चदरम्यान खान्देश महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. महोत्सवात लोक कलावंत, शाहीर, हौशी कलावंत, अभिनय, मिमीक्री, अंधश्रध्दा जनजागृती, समूह गीत, नृत्य, गीतगायन, सामाजिक प्रबोधन उपक्रम राबविणाऱ्या संस्थांना सहभागी होता येईल.

# स्व.अजितदादा पवार यांना चांदसर येथे भावपूर्ण श्रद्धांजली

**प्रतिनिधी । धरणगाव**

स्वर्गीय अजितदादा पवार यांच्या नुकत्याच झालेल्या निधनाने संपूर्ण परिसरात शोककळा पसरली आहे. त्यांच्या आत्म्यास शांती लाभावी, यासाठी चांदसर येथे श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष संजय पवार यांच्या पुढाकाराने हा कार्यक्रम पार पडला. या श्रद्धांजली कार्यक्रमाला माजी मंत्री गुलाबराव देवकर, माजी मंत्री डॉ. सतीश पाटील, राष्ट्रवादीच्या नेत्या प्रतिभा शिंदे, हभप जळकेकर महाराज, सामाजिक कार्यकर्ते शिवराम पाटील, राष्ट्रवादी (श.प.) युवती जिल्हाध्यक्षा कल्पिता पाटील, भाजपा नेते चंदनराव पाटील यांच्यासह विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी, सामाजिक संघटनांचे प्रतिनिधी तसेच असंख्य कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी स्वर्गीय अजितदादा पवार यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून उपस्थित मान्यवरांनी भावपूर्ण श्रद्धांजली वाहिली.





# नगरसेवक सुनिल चौधरी यांच्या कार्याचा गौरव

## • निवडणूकपूर्व काळातच स्वखर्चाने केली जनहिताची कामे

**प्रतिनिधी । धरणगाव**



कर्तव्य बहुउद्देशीय संस्थेचे अध्यक्ष तथा प्रभाग क्रमांक ८ चे नगरसेवक सुनील पंढरीनाथ चौधरी हे केवळ लोकप्रतिनिधी म्हणूनच नव्हे, तर सामाजिक, शैक्षणिक व अध्यात्मिक जाणिवा जपणारे संवेदनशील समाजनेते म्हणून धरणगाव परिसरात ओळखले जात आहेत. विशेष म्हणजे नगरसेवक होण्यापूर्वीच त्यांनी स्वखर्चाने लाखोंची समाजोपयोगी कामे करून जनतेच्या मनात आपले स्थान निर्माण केले आहे.

सोनवद रोड, धरणगाव येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कारासाठी येणाऱ्या नागरिकांच्या सोयीसाठी त्यांनी पुढाकार घेतला. अंत्यविधीच्या वेळी मानसिक शांतता लाभावी, या उद्देशाने अत्यंत पवित्र असा 'ॐ पूर्णमदः' शांती मंत्र कोरलेला पत्र्याचा बोर्ड उभारण्यात आला आहे. तसेच, स्मशानभूमीत बसण्याची कोणतीही सुविधा नसल्याने नागरिकांना ऊन-पावसाचा त्रास सहन करावा लागत होता. ही अडचण ओळखून चौधरी यांनी स्वखर्चाने सुमारे पाच लाख ५० हजार रुपये खर्च करून पत्र्याचे शेड उभारून दिले. याच धर्तीवर कृषी उत्पन्न बाजार समितीजवळील स्मशानभूमीतही शांती मंत्राचा स्वतंत्र फलक बसवण्यात आला आहे.

धरणगाव शहरातील तेली तलावाजवळील मारुती मंदिर परिसरात भाविकांसाठी उन्ह-पावसापासून संरक्षण मिळावे, यासाठीही त्यांनी शेड उभारले आहे. यामुळे भाविकांमध्ये समाधान व्यक्त होत आहे. सामाजिक सुरक्षिततेच्या दृष्टीने शहरातील विविध ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसवून महिला, ज्येष्ठ नागरिक व सार्वजनिक मालमत्तेच्या सुरक्षिततेसाठी त्यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे.

शैक्षणिक क्षेत्रात गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार, त्यांना प्रोत्साहन देणे तसेच अध्यात्मिक क्षेत्रात शिवपुराण, श्रीमद् भागवत कथा, कीर्तन सप्ताह यांसारख्या उपक्रमांना सहकार्य करून समाजात सकारात्मक संस्कार रुजवण्याचे कार्य ते सातत्याने करीत आहेत.

एकंदरीत, पद, प्रसिद्धी किंवा राजकीय लाभापेक्षा जनसेवेलाच प्राधान्य देणारे सुनील पंढरीनाथ चौधरी हे धरणगावमधील आदर्श लोकप्रतिनिधी म्हणून नागरिकांमध्ये विश्वासार्ह ठरत आहेत.

## बिल्डिंग मटेरियलची दुकाने दर रविवारी राहणार बंद

**प्रतिनिधी । अमळनेर**

शहरातील सर्व बिल्डिंग मटेरियल विक्रेत्यांची बैठक नुकतीच धुळे रोडवरील पाठक ट्रेडर्स येथे पार पडली. या बैठकीत व्यापाऱ्यांची एकजूट होऊन अमळनेर शहर बिल्डींग मटेरियल असोसिएशनची स्थापना करण्यात आली. यात असोसिएशनच्या अध्यक्षपदी प्रवीण पाठक, उपाध्यक्षपदी रोहन वाडिले, सेक्रेटरीपदी हिरामण देवासी, तर खजिनदारपदी संतोष पटेल यांची निवड करण्यात आली. दर रविवारी सर्व दुकाने पूर्णपणे बंद ठेववावीत, असा निर्णय घेण्यात आला.

# अडावद येथे रंगला खाटू श्याम यांच्या जीवनावर आधारित भजन संध्या कार्यक्रम

**प्रतिनिधी । चोपडा**

**तालुक्यातील अडावद येथे जया एकादशीच्या पवित्र दिवसाचे औचित्य साधून खाटू श्याम यांच्या जीवनावर आधारित 'शुकराना मेरे श्याम का भजन संध्या' कार्यक्रम व्यापारी संघटनेमार्फत आयोजित करण्यात आला. त्यास व्यापारी संघटनेने सहकार्य लाभले.**

कृषी उत्पन्न बाजार समितीच्या चोपडा उपबाजार अडावद येथे खुल्या जागेवर ५ रोजी संध्याकाळी ७:३० वाजता 'हारे का सहारा बाबा श्याम हमारा' यांच्या जीवनावर आधारित श्री श्याम बाबा का भव्य संकीर्तन व भजन सध्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यात भजन गायक जळगाव येथील उज्वला वर्मा यांनी बार्बरिक उर्फ खाटू श्याम यांचा जीवनपट आपल्या भजनातून उलगडला होता. यावेळी शेकडो भाविकांनी भक्तिभावाने या भजन संध्येचा रसास्वाद घेतला. सदर कार्यक्रमाचे आयोजन अडावद येथील व्यापारी संघटनेमार्फत करण्यात आले होते.



# कै.पंढरीनाथ चौधरी यांच्या पुण्यस्मरणानिमित्त आज कीर्तन

**प्रतिनिधी । धरणगाव**

**येथील रहिवासी कै. पंढरीनाथ भिवसन चौधरी यांच्या प्रथम पुण्यस्मरणानिमित्त भक्तिमय कीर्तन सोहळा शनिवारी रात्री ८ ते १० या वेळेत चौधरी टेंट हाऊस, तलाठी गल्ली धरणगाव, येथे संपन्न होणार आहे.**





या प्रसंगी प्रसिद्ध कीर्तनकार हभप. भागवताचार्य किशोर महाराज मोरदडकर हे प्रभावी वाणीने हरिकथा व कीर्तन सादर करणार आहेत. उपस्थित भाविकांना अध्यात्मिक आनंदाचा लाभ मिळणार आहे. या कीर्तन सोहळ्यास श्री. १००८ महामंडलेश्वर हभप. भगवानदासजी बाबा उपस्थित राहणार आहेत. कै. पंढरीनाथ चौधरी यांच्या स्मृती जपण्यासाठी तसेच समाजात अध्यात्मिक व सांस्कृतिक मूल्यांचा प्रसार व्हावा, या उद्देशाने सदर कार्यक्रमाचे आयोजन नगरसेवक सुनील पंढरीनाथ चौधरी व समस्त वाघ परिवार यांच्या वतीने करण्यात आले आहे. कार्यक्रमाचे नियोजन माऊली वारकरी शिक्षण संस्था, तसेच हभप. एकनाथ महाराज व ह.भ.प. मेघनाद महाराज ठाकरे हे करीत आहेत. या भक्तिमय सोहळ्याचा लाभ घेण्यासाठी वारकरी संप्रदायातील भाविक, नागरिक व पंचक्रोशीतील नागरिकांनी उपस्थित राहण्याचे आवाहन सुनील चौधरी यांनी केले आहे.

## बसमध्ये चढताना लांबवली सोन्याची बांगडी


**प्रतिनिधी । मुक्ताईनगर**

बसमध्ये चढत असताना अज्ञात चोरट्याने एका महिला प्रवाशाच्या हातातील सोन्याची बांगडी कापून नेल्याची घटना मुक्ताईनगर बसस्थानकात घडली. रेणुका नगरातील सिंधुबाई दि.४ फेब्रुवारी रोजी दुपारी १२ वाजेच्या सुमारास बसमध्ये चढत असताना गर्दीचा फायदा घेत अज्ञात चोरट्याने हातातील ७० हजार रुपये किमतीची सोन्याची बांगडी कापून चोरून नेली.

# प्रताप विद्यामंदिराच्या एनसीसी अधिकाऱ्यांना दोन स्टार लावून पदोन्नती

**प्रतिनिधी । चोपडा**

**येथील प्रताप विद्यामंदिराचे एनसीसी अधिकारी रोहन पाटील व जयश्री बडगुजर यांना दि ५ फेब्रुवारी रोजी ४९, महाराष्ट्र बटालियन एनसीसी अमळनेर आर्मी लाईन एरिया या ठिकाणी बटालियनचे सीओ अमित रे तसेच ए/ओ पिणाक बिनाकी यांनी दोन स्टार लावून सेकंड ऑफिसर म्हणून एन. सी.सी.मध्ये पदोन्नत केले आहे.**



याप्रसंगी दोघं एनसीसी अधिकारी यांचे चोपडा एज्युकेशन सोसायटीचे चेअरमन, अध्यक्ष, उपाध्यक्ष, सचिव, सर्व कार्यकारी मंडळ, शाळेचे मुख्याध्यापक, उपमुख्याध्यापक उपप्राचार्य, पर्यवेक्षक, संस्थेचे समन्वयक, सर्व शिक्षक बंधू-भगिनी व शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थ्यांनी अभिनंदन केले आहे.





# पंकज विद्यालयात शिष्यवृत्ती परीक्षेसंदर्भात मार्गदर्शन सभा

**प्रतिनिधी । चोपडा**

**पंकज विद्यालय, चोपडा (प्राथमिक विभाग) येथे इयत्ता चौथी शिष्यवृत्ती परीक्षा २०२६ च्या तयारीसाठी पालकांची मार्गदर्शनपर सभा उत्साहात पार पडली. विद्यार्थ्यांचे शैक्षणिक यश, गुणवत्ता वृद्धी व शिष्यवृत्ती परीक्षेतील उज्वल निकाल या उद्देशाने सभेचे आयोजन करण्यात आले होते.**





सभेची सुरुवात इयत्ता चौथीतील विद्यार्थिनींनी सादर केलेल्या विश्वकल्याण प्रार्थनेने करण्यात आली. यानंतर डी. एम. जैस्वाल यांनी शिष्यवृत्ती परीक्षेचे विषय स्वरूप, प्रश्नपत्रिकेची रचना, अभ्यासक्रमातील महत्त्वाचे घटक व बदलते परीक्षा स्वरूप याबाबत सविस्तर माहिती दिली. भाषा, गणित, इंग्रजी व बुद्धिमत्ता या विषयांवरील तयारी कशी करावी, याचे मार्गदर्शन पालकांना करण्यात आले. विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढविण्यासाठी शाळेत राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांची माहिती विजय राठोड यांनी दिली. यामध्ये नियमित सराव चाचण्या, जचठ उत्तरपत्रिका सराव, विषयनिहाय मार्गदर्शन वर्ग, प्रश्न सोडवण्याच्या क्लुप्त्या, दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांसाठी अतिरिक्त तास तसेच वेळ व्यवस्थापन व आत्मविश्वास वृद्धीसाठी विशेष उपक्रमांचा समावेश असल्याचे त्यांनी सांगितले.

मुख्याध्यापक एम. व्ही. पाटील यांनी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासावर भर देत, शाळा व पालक यांच्या समन्वयातून निश्चितच यश साध्य होईल, असा विश्वास व्यक्त केला. पालकांनी घरी अभ्यासासाठी योग्य वातावरण देण्याची तयारी दर्शविली. कार्यक्रमाच्या शेवटी मनोज अहिरे यांनी आभार मानले.